राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२१/ 278 दि. 12 FEB 2021

प्रति,
प्राचार्य
सर्व शासकीय पदवी/ पदविका संस्था

**विषय- तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत विभागीय कार्यालये व शासकीय संस्था मधील गट अ व गट ब च्य अधिका-यांची वयाच्या ४९/५४ व्या वर्षापलिकडै / अर्हताकारी सेवेची ३० वर्षाची सेवा झाल्यावर सेवा पुर्नविलोकन करुन पात्र-अपात्रता आजमाविण्याच्या दृष्टीने करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ- संचालक, तत्रंशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.५/तंशिसं/५०-५५/२०२१/८४ दिनांक १२/०२/२०२१

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. गट अ व गट ब अधिकारी यांच्या वयाच्या ४९-५४ वर्षापलीकडे / अर्हताकारी सेवेची ३० वर्षाची सेवा झाल्यावर सेवा पुर्नविलोकन करुन पात्र-अपात्रता आजमाविण्यासाठीच्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्याचे काम संचालनालय स्तरावर चालू आहे. सदर प्रस्ताव तातडीने शासनांस सादर करावयाचा असल्यामुळे संचालनालयांत कार्यासन क्र.५ चे कामकाज दिनांक १३/०२/२०२१ व १४/०२/२०२१ या शासकीय सुट्टीच्या दिवशी चालू राहणार आहे.

तद्नुषंगाने आपल्या संस्थेशी संबंधित कोणत्याही माहितीची वरीष्ठ कार्यालयांस आवश्यकता पडल्यास ती देणेसाठी उपरोक्त विषयाच्या कामकाजाशी संबंधित असलेले आपल्या संस्थेतील जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांना उपरोक्त दोन्ही दिवशी कार्यालयांत उपस्थित राहणेबाबत सुचित करण्यात यावे.

12/02/21

(मा.रा.जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०५/४२५/४७२
ई-मेल – desk5@dtemaharashtra.gov.in

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

जा. क्रमांक- ५/तंशिसं/५०-५५/२०२१/८४
तात्काळ

दिनांक - 12 FEB 2021

प्रति,

१. मा. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर

२. मा. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

विषय- तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत विभागीय कार्यालये व शासकीय संस्था मधील गट-अ व गट-ब च्या अधिकाऱ्यांची वयाच्या ४९/५४ व्या वर्षापलीकडे / अर्हताकारी सेवेची ३० वर्षाची सेवा झाल्यावर सेवा पुनर्विलोकन करुन पात्र-अपात्रता आजमाविण्याच्या दृष्टीने करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ- सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक- एलपीएल-२०१७/प्रक्र.२१/का. पंधरा दि. १० जुन, २०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयाचे कृपया अवलोकन करावे. संदर्भीय शासन निर्णयातील तरतूदीनुसार, संचालनालयांतर्गत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये व त्यांच्या अधिनस्त शासकीय संस्थांमधील / कार्यालयातील गट- अ व गट- ब अधिकारी यांची वयाच्या ४९/५४ वर्षापलीकडे / अर्हताकारी सेवेची ३० वर्षाची सेवा झाल्यावर सेवा पुनर्विलोकन करुन पात्र-अपात्रता आजमाविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावयाची आहे.

याबाबतीत प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही संचालनालय स्तरावर सुरु आहे. सदरचा प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करण्याचे संचालकांचे निर्देश आहेत. त्यास अनुसरुन संचालनालयातील कार्यासन क्र. ०५ चे कामकाज दि. १३/०२/२०२१ व १४/०२/२०२१ या शासकीय सुट्टीच्या दिवशी सुरु असणार आहे.

विषयांकीत कामकाजाकरीता माहितीची पडताळणी करतांना आपल्या कार्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या प्रस्तावात काही त्रुटी आढळल्यास विभागीय कार्यालयांकडून माहितीची गरज भासणार आहे. तरी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयातील या कामकाजाशी संबंधीत कार्यासनातील जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांना या दोन दिवशी कार्यालयात पुर्णवेळ उपस्थित राहण्याबाबत निर्देशित करण्यात यावे. तसेच आपल्या विभागांतर्गत शासकीय कार्यालये व संस्था मधील या कामकाजाशी संबंधीत जबाबदार कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्याकरीता आपल्या स्तरावरुन निर्देशित करण्यात यावे. ही विनंती.

आपला,

(संजय पवार)
**सहाय्यक संचालक (अतांत्रिक)**
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

F:\D Drive\letter 111111.docx

269

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
12 FEB 2021
1379
आवक क्र.............